# तासगावातील वसंतरावदादा पाटील महाविद्यालयाच्या एन.सी.सी. विभागाचे यश



❑ तासगाव : प्रतिनिधी

पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव येथील एन.सी.सी. विभागाच्या 'सी' प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला. गेल्या अनेक वर्षांपासून शंभर टक्के निकालाची यशस्वी परंपरा या विभागाने यावर्षीही कायम राखली. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये एकूण सतरा एन.सी.सी.कॅडेट्स 'सी' प्रमाणपत्र परीक्षेस बसले होते. त्यापैकी सात कॅडेट्सना 'अ' श्रेणी मिळाली. यशस्वी विद्यार्थ्यांना १६ महाराष्ट्र बटालियन एन. सी.सी.सांगलीचे कमांडिंग ऑफिसर कर्नल पी.एस. धालीवाल , एडम ऑफिसर लेफ्टनंट कर्नल समीर वर्मा, कंपनी कमांडर लेफ्टनंट डॉ. विनोदकुमार कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले.

महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी.सांगलीचे विद्यमान कमांडिंग ऑफिसर कर्नल एस के बाबू, एडम ऑफिसर कुलकर्णी तसेच संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे सचिवा प्राचार्या सौ.शुभांगीताई गावडे , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांनी अभिनंदन केले.

Scanned with CamScanner